दि. 02.11.2026

प्रेसनोट

पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाची परभणीमध्ये अवैध वाळू विरुध्द मोठी कारवाई

87 लाखांची साधनसामुग्री व वाळू जप्त

परभणी जिल्हयात अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरुद्ध काही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर अवैध रेती विरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकास जिंतूर पोलीस ठाणे हद्दीतील मौजे निलज शिवारात पाठविले होते.

सदर पथकाने, आज दिनांक 02.11.2026 रोजी मौजे निलज शिवारातील वाळू धक्क्यावर कारवाई केली असता, सदर ठिकाणी इंजिन बोटच्या सहाय्याने नदी पात्रातून वाळू उपसा करुन नदीकिनारी आणली जात असल्याचे निदर्शनास आले. सदर कारवाईत पथकाने, (3) टिप्पर, एक जेसीबी, ट्रॅक्टर, चाळणी व नदीपात्रातून बाहेर काढून ठेवलेली (10) ब्रास वाळू असा एकूण 87,75,000/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमूद प्रकरणात जिंतूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/ गणेश राठोड, पोहेकॉ/ संदिप वाघाडे व पोहेकॉ/ गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

' खबर ' हेल्पलाइन वरुन माहिती द्या : अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलीसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइन वरून नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहचवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड.